# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): कोल्हापुर **P.S.**(ठाणे): वडगांव **Year** (वर्ष): 2021
**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0530 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 29/09/2021 01:31 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
   1. **Day**(दिवस): मंगलवार **Date From** (दिनांक पासून): 28/09/2021
   **Time Period** (कालावधी): **Date To** ( दिनांक पर्यंत): 28/09/2021
   **Time From** (वेळेपासून): 11:45 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 15:15 बजे

   (b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
   **Date** (दिनांक ): 28/09/2021 **Time** (वेळ): 16:00 बजे

   (c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
   **Entry No.** (नोंद क्र.): 005 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 29/09/2021 01:03 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
   1. (a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 2 किमी
   **Beat No.** (बिट क्र.):

   (b) **Address** (पत्ता): बिकानेर बेकरीचे समोररस्त्याकड,वडगाव पोठा डाबाजुचहाचे टपरीवर , पेठवडगाव ,हातकणगंले

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
   **Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
   **District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):
   (a) **Name** (नाव): रोहित मधुकर लोले
   (b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
   (c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
   (e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
   (f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):
   **Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|



Scanned by TapScanner

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | फेमिना फक्टरीजवळ,पेठ वडगांव,ता हातकणंगले,वडगांव ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | फेमिना फक्टरीजवळ,पेठ वडगांव,ता हातकणंगले,वडगांव ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | Ashok Krushnat Jadhav | | | 1. वडगाव पोलीस ठाणे,हातकणंगले,वडगांव ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | चेतन गावडे चेतन गावडे चेतन गावडे | | | 1. कोरेगांव ,ता वाळवा,सांगली ग्रमीण, सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 3 | प्रितम दिपक ताटे | | | 1. नवीन वसाहत,, भादोले रोड,हातकणंगले ,वडगांव ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/ रू. | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 5,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 28/09/2021 मी रोहित मधुकर लोले, वय 29, व्यवसाय - रिक्षा चालक, रा. फेमिना फक्टरीजवळ, पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, मो.नं. 8788970805, आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्त्यावर कुटूंबियांसह एकत्रित राहणेस असुन रिक्षा चालकाचा व्यवसाय करतो. त्याच बरोबर अधिक जोडधंदा म्हणुन थोडयाप्रमाणात मटका जुगाराचा धंदा करतो. दि. 21/07/2021 रोजी संध्याकाळी वडगांव येथील श्रीराम चैकात उभा राहुन मोबाईलवरून मटक्याचे आकडे घेत असताना मला वडगांव पोलीस ठाणेचे पोलीस अशोक जाधव यांनी मला पकडुन वडगांव पोलीस ठाणे येथे घेवुन गेले होते. त्यादिवशी तेथे विकास घस्ते व दादासो माने नावाचे पोलीस होते, त्या तिघांनी मला शिवीगाळ, मारहाण करून रात्री 11.00 वाजेपर्यंत पोलीस ठाणेत बसवुन ठेवुन माझेवर जुगाराचा गुन्हा दाखल केला होता. त्याचवेळी विकास घस्ते यांनी माझा मोबाईल काढुन घेवुन त्या तिघांनी मिळुन माझेकडे माझेविरूध्द दाखल गुन्हयात मदत करण्यासाठी म्हणुन माझेकडे 60,000/- रूपयाची मागणी केली, पैसे दिले नाहीतर मदत करणार नाही व गुन्हयात अटक करणार असे सांगुन मला सोडुन दिले होते. तसेच मला माझेविरूध्द दाखल गुन्हयाची कोणतीही माहिती व एफआयआर कापी मला त्यांनी दिलेली नव्हती. गुन्हयात मदत होणेसाठी मी नाईलाजास्तव पोलीस अशोक जाधव यांचेकडे 60,000/- रू. वडगांव येथील हातकणंगले रोडवरील राम बाजार येथे दिले होते. त्यानंतर मी त्यांचेकडे ब-याचवेळा एफआयआर कापी व गुन्हयात मदत करण्याची विनंती केली. परंतु त्यांनी मला माझेविरूध्द दाखल गुन्हयाची एफआयआरची प्रत दिली नाही. दि. 25/09/2021 रोजी पोलीस अशोक जाधव यांनी मला भेटुन पोलीस ठाणेत येवुन भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी त्यांची भेट घेतली असता, त्यांनी व पोलीस विकास घस्ते यांनी मिळुन माझेकडे माझेविरूध्द दाखल गुन्हयात मदत करणेसाठी व त्यांची एफआयआरची प्रत देण्यासाठी आणखी 20,000/- रूपये द्यावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी



Scanned by TapScanner

त्यांचेकडे यापुर्वी पैसे दिले आहेत साहेब आता काही मागु नका मदत करा अशी विनंती केली, पण त्यांनी माझे काहीही ऐकुण घेतले नाही. त्यावर मी त्यांना पैशाची जुळणी झालेवर भेट घेतो असे सांगुन निघुन आलो होतो.वडगांव पोलीस ठाणेचे पोलीस अशोक जाधव, दादासा माने व विकास घस्ते हे माझेकडे मागणी करीत असलेले 20,000/- रुपये लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे. परंतु वडगांव पोलीस ठाणेचे पोलीस अशोक जाधव, दादासो माने व विकास घस्ते यांना लाच देणेची माझी इच्छा नसलेने मी दि. 27/09/2021 रोजी अन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर येथे जावुन पोलीस उपअधीक्षक श्री बुधवंत साहेबांची भेट घेवुन माझी वरीलप्रमाणे थोडक्यात तक्रार सांगुन त्यांचेकडे माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. त्यावेळी मी बुधवंत साहेबांना पोलीस अशोक जाधव, विकास घस्ते व अशोक जाधव यांना दि. 28/09/2021 रोजी भेटणार असल्याचे सांगितले होते. त्यामुळे बुधवंत साहेबांनी मला दि. 28/09/2021 रोजी सकाळी 11.00 वाजता वाठार ते भादोले जाणारे रोडवर येण्यास सांगितले. दि. 28/09/2021 रोजी ठरल्याप्रमाणे मी डीवायएसपी बुधवंत साहेब, शासकीय पंच व त्यांचे स्टाफला वाठार ते भादोले जाणारे रोडवर भेटलो. त्यावेळी त्यांनी मी दि.27/09/2021 रोजी वडगांव पोलीस ठाणेचे पोलीस अशोक जाधव, दादासो माने व विकास घस्ते यांचे लाच मागणीचे अनुषंगाने त्यांचेविरुध्द कारवाई होणेकरीता माझा दिलेला तक्रारी अर्ज आपले हातात घेतला व माझी तक्रार पंचांना सांगणेची सुचना दिली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर श्री. बुधवंत साहेबांनी माझी लेखी तक्रार पंचांना वाचण्यास दिली. मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी तक्रार एकच असलेची पंचांची खात्री झाली. त्यानंतर श्री. बुधवंत साहेबांचे सुचनेनुसार दोन्ही पंचांनी माझे लेखी तक्रारीखाली सह्या केल्या. तसेच बुधवंत साहेबांनी देखील तक्रारी खाली सही केली.श्री. बुधवंत साहेबांनी मला व दोन्ही पंचांना वडागांव पोलीस ठाणेचे पोलीस अशोक जाधव, दादासो माने व विकास घस्ते हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. तसेच पडताळणीकरीता मी पोलीस अशोक जाधव, दादासो माने व विकास घस्ते यांना भेटणेस जाताना माझेसोबत पंच श्री. बनगे यांना पाठवणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी त्यांचेकडील खाजगी वाहनामध्येच त्यांचे कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून त्यामध्ये नवीन सनडिस्क कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडी कार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाशण ध्वनिमुद्रीत नसल्याची खा◌ी◌ी◌ात्री करुन दिली. मला व पंच श्री. बनगे यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यांनतर बुधवंत साहेबांनी गाडीमध्ये त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर चालू करुन तो माझे गळयात अंगावरील शर्टचे आतील बाजुस अडकवून दिला व मला आणि पंच बनगे यांना माझेकडील मोटर सायकलवरून पोलीस अशोक जाधव, दादासो माने व विकास घस्ते यांची भेट घेणेकरीता वडगांव पोलीस ठाणे येथे पाठविले. वडगांव पोलीस ठाणे जवळील चहाचे टपरीवर माझी पोलीस अशोक जाधव यांचेशी भेट झाली, त्यावेळी त्यांनी माझेकडे माझेविरूध्द दाखल गुन्हयामध्ये मदत करणेसाठी व त्यांची एफआयआर प्रत देणेसाठी माझेकडे 5,000/- रू. लाचेची मागणी केली व मला माझा धंदा परत सुरू करणेस सांगुन दादा माने यांना महिन्याला एंन्ट्री देण्यासाठी भेट घालुन देत असल्याचे सांगितले. तसेच पोलीस दादासो माने हे बाहेर गेल्याचे व पोलीस विकास घस्ते हे रजेवर असल्याचे समजले. त्यामुळे मी व पंच श्री बनगे असे माझे मोटर सायकलवरून पुन्हा वाठार-भादोले जाणारे रोडवर श्री. बुधवंत साहेब व त्यांचा स्टाफ थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी श्री. बुधवंत सा◌ो यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर श्री.बुधवंत साहेबांनी मला गाडीतुन बाहेर थांबणेस सांगुन पहिल्यांदा पंच बनगे यांचेशी चर्चा केली. त्यानंतर मला परत गाडीमध्ये बोलवुन त्यांनी माझेकडे घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगुन गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी व एफआयआरची प्रत देण्यासाठी पोलीस जाधव यांनी माझेकडे 5,000/- रू. लाचेची मागणी करुन पैसे फोन करून घेवून येणेस सांगितले असल्याचे सांगितले. त्यानंतर बुधवंत साहेबांनी डिजिटल रेकार्डरमधील माझे आणि वडगांव पोलीस ठाणेचे पोलीस अशोक जाधव यांचेतील लाच मागणी संदर्भातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. सदर ऐकले संभाशणावरुन व पंच श्री. बनगे आणि माझे सांगणेवरुन पोलीस अशोक जाधव यांनी माझेविरूध्द दाखल गुन्हयात मदत करणेसाठी व त्याची एफआयआरची प्रत देण्यासाठी माझेकडे 5,000/- रू. लाच रक्कम मागणी करून पैसे घेवून येणेस सांगितलेचे निश्पन्न झाले. त्यामुळे श्री. बुधवंत साहेबांनी मला व पंचांना सापळा पुर्व पंचनामा सुरु करीत असले◌ेचे सांगितले. त्यावेळी मला बुधवंत साहेबांनी वडगांव पोलीस ठाणेचे पोलीस अशोक जाधव यांना देणेसाठीची लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी माझेकडे उपलब्ध असलेले 500/- रु. दराच्या 10 नोटा मिळून रु. 5,000/- लाच म्हणून देणेसाठी हजर केले. तेव्हा त्यांचेकडील स्टाफ श्री देसाई यांनी नोटांचे नंबर्स लिहून घेतले. त्यानंतर बुधवंतसाहेबानी मला आणि पंचांना अन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे महत्व सांगुन गुणधर्म सांगितले. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना गाडीचे मधील सिटवर पांढरा कागद अंथरुन त्यावर लाच रक्कमेतील नोटा ठेवून पोका देसाई यांनी अन्थ्रासिन पावडर लावून घेतली व गाडीमध्ये काळे कापडाचे साहायाने अंधार करुन नोटांची अल्ट्राव्हायोलेट बटरीचे सहायाने मला व पंचांना तपासणी करुन दाखविली. त्यानंतर देसाई यांनी ती लाच रक्कम रु. 5,000/- माझे शर्टचे डाव्या बाजुचे खिषात घडी करून ठेवली. त्यानंतर बुधवंत साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर मधील वापरले मेमरी कार्ड काढुन सुरक्षित आपले जवळ ठेवले व रेकर्डरमध्ये नवीन सनडिस्क कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडी कार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाशण ध्वनिमुद्रीत नसल्याची खात्री करून देवुन मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचारी यांना सापळ्याचे अनुषंगाने योग्य त्या सुचना देवुन पोलीस अशोक जाधव यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर तोंडावरील मास्क काढुन हातात घेणेबाबत सुचना दिली.त्यानंतर बुधवंत साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर चालु करुन तो माझे गळयात षर्टचे आतील बाजूस अडकविला. तेथून मला व पंच बनगे यांना वडगांव पोलीस ठाणेचे पोलीस अशोक जाधव यांची भेट घेण्यासाठी वडगांव पोलीस ठाणेचे समोर उजवे बाजुस असले पेट्रोल पंपाकडे पाठविले व बुधवंत साहेब व त्यांचा स्टाफ आणि पंच नं. 2 श्री पाटील असे त्यांचेकडील खाजगी वाहनाने आमचे पाठोपाठ आले होते. रस्त्यात मध्ये माझी गाडी बंद पडल्यामुळे बुधवंत साहेबांनी मला त्यांचेकडील गाडीत बोलवुन रेकार्डर बंद करून ताब्यात घेतला. मी व त्यांचेकडील स्टाफच्या मदतीने माझी गाडी चालु केली. त्यावेळी पुन्हा बुधवंत साहेबांनी मला गाडीमध्ये बोलवुन डिजीटल व्हाईस रेकार्डर चालु करुन तो माझे गळयात षर्टचे आतील बाजूस अडकविला. त्यानंतर मी व पंच बनगे असे माझे गाडीवरून वडगांव पोलीस ठाणेचे जवळील पेट्रोल पंपाकडे पाठविले. तेथे जावुन मी पोलीस अशोक जाधव यांना दोन ते तीन वेळा फोन केला, परंतु त्यांनी माझे फोन उचलले नाहीत व मला परत फोन केला नाही. त्यामुळे मी व पंच बनगे तेथुन निघुन परत वाठार-भादोले रोडवर येवुन थांबलो, बुधवंत साहेब व त्यांचेकडील स्टाफ असे खाजगी वाहनाने आमचे पाठोपाठ तेथे आले होते. बुधवत साहेबांनी मला गाडीमध्ये बोलवुन माझे गळ्यातील डिजीटल व्हाईस रेकार्डर बंद करून ताब्यत घेतला. त्यानंतर श्री.बुधवंत साहेबांनी मला गाडीतुन बाहेर थांबणेस सांगुन पहिल्यांदा पंच बनगे यांचेशी चर्चा केली. त्यानंतर मला परत गाडीमध्ये बोलवुन त्यांनी माझेकडे घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगुन पोलीस अशोक जाधव यांनी फोन उचलला नसल्याने परत आलेचे सांगितले. त्यावर पोलीस जाधव यांचे फोनची वाट पाहणेचे ठरवुन आम्ही सगळे तेथेच थांबुन राहिलो. थोडयावेळानंतर मला माझे मोबाईलवर एका अनोळखी इसमाचा फोन आला, त्याने पोलीस अशोक जाधव यांनी मागितलेले पैसे त्यांचेकडे देण्यास सांगितले असल्याचे सांगितले. तेव्हा मी जेवत असल्याचे सांगुन फोन बंद केला, सदरची गोष्ट मी बुधवंत साहेबांचे कानावर घातली. थोडयावेळाने मी पुन्हा त्या अनोळखी नंबरवर फोन करून त्यास भेटणेबाबत विचारले असता, त्याने मला त्यांचेकडुन प्रितम ताटे नावाचा त्यांचा भाऊ येत असल्याचे सांगितले. त्यावेळी आमचेत वडगांव येथील बिकानेर बेकरीसमोर भेट घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे बुधवंत साहेबांनी मला व पंचांना याआधी दिलेल्या सुचना देवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर चालु करून तो माझे गळयात षर्टचे आतील बाजूस अडकविला.



Scanned by TapScanner

तेथून मला व पंच बनगे यांना अनोळखी इसम प्रितम ताटे यांची भेट घेण्यासाठी वडगांव येथील बिकानेर बेकरीकडे पाठविले व बुधवंत साहेब व त्यांचा स्टाफ आणि पंच नं. 2 श्री पाटील असे त्यांचेकडील खाजगी वाहनाने आमचे पाठोपाठ आले होते. तेथे जावुन मी व पंच बनगे असे बिकानेर बेकरीजवळ यादव चैकात पोहचल्यावर मी परत मला आलेल्या अनोळखी इसमास फोन केला, त्याने त्यांचे फोनवरून कान्फरन्स कालने प्रितम ताटेला फोन केला. तेव्हा मी त्यास बिकानेर बेकरीसमोर उभारलो असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे अनोळखी इसम माझेकडे येऊन गाडीवरून खाली उतरून माझेजवळ आला. त्यावेळी मी माझे शर्टचे खिषातील लाच रक्कम 5,000/- रू. प्रितम ताटे यांचेसमोर धरले असता, त्याने ती आपले हाताने स्विकारुन मोजत असताना मी माझे तोंडावरील मास्क काढून पुर्वनियोजित इशारा केला. तेव्हा बुधवंत साहेब व त्यांचे सोबतचा स्टाफ यांनी प्रितम ताटे व त्यांचेसोबतचे इसमा . मुळ फिर्याद सोबत जोडली आहे.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): SANTOSH SHRIMANT GHOLAVE
**Rank** (पद): I (Inspector)
**No.**(क्र.): 11301000362SSG **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): SANTOSH SHRIMANT GHOLAV
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 11301000362SSGM7401C



Scanned by TapScanner